# पेमेंट बँकांपासून फायदा

**प्रीती कुलकर्णी**

पेमेंट बँक या संकल्पनेचे आणि रिझर्व्ह बँकेने परवानगी दिलेल्या पेमेंट बँकांचे स्वागत बँकिंग क्षेत्राने केले आहे. या बँकांपासून ग्राहकांनाही चांगली सेवा मिळमार असून या बँकांचा व्यवहार खर्चही कमी असणार आहे हे लक्षात घ्यायला हवे.

गेल्याच आठवड्यात, रिझर्व्ह बँकेने पेमेंट बँक स्थापन करण्यासाठी उत्सुक असणाऱ्या ११ जणांना (उद्योगांना) अशी बँक स्थापन करण्याची तत्त्वत: परवानगी दिली. पेमेंट बँकेला कर्ज देण्याची परवानगी असणार नाही. परंतु ही बँक ठेवी स्वीकारू शकेल, पैशाचे हस्तांतरण (रेमिटन्स) करू शकेल. शिवाय या सेवा अशी बँक स्थापन करणारा उद्योग स्वत:च्या केंद्रांच्या किंवा ॲक्सेस पॉइंट्सच्या माध्यमातून, बिझनेस करस्पॉनडन्ट्सच्या माध्यमातून किंवा त्यांनी तयार केलेल्या नेटवर्कच्या माध्यमातून देणार आहे.

पेमेंट बँकेमुळे बँकिंग सेवा न पोहोचलेल्या गटांपर्यंत बँकिंग पोहोचणार आहे आणि याद्वारे सर्वसमावेशक आर्थिक विकास अधिक खोलवर होणार आहे. या बँका सर्व प्रकारच्या ग्राहकांना सेवा देतील. या बँकांना देशातील तरुणांची अधिक पसंती मिळेल. सर्व प्रकारच्या ग्राहकांना सेवा दिल्याखेरीज या बँकांना



नफा कमावता येणार नाही, असे निरीक्षण प्राइसवॉटरहाउस कूपरच्या बँकिंग व कॅपिटल मार्केट्स विभागाच्या भागीदार शिन्जिनी कुमार यांनी नोंदवले आहे.

रोकडविरहित व्यवहारांना अर्थात डिजिटल पेमेंटना चालना दिली जाण्याच्या काळातच रिझर्व्ह बँकेने पेमेंट बँकांना परवानगी दिल्यामुळे याला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. बोस्टन कन्सल्टिंग ग्रुपच्या एका अभ्यासानुसार २०२०पर्यंत डिजिटल बँकिंगची व्याप्ती २३ कोटी ग्राहक इतकी होणार आहे. पेमेंट बँका कार्यरत झाल्यास ही ग्राहकसंख्या वाढून ३० कोटींवर जाईल असाही अंदाज आहे.

सध्या पेमेंट प्रक्रिया सेवा देणाऱ्या बँकांनीही पेमेंट बँकांसाठी योग्य वातावरण तयार करायला सुरुवात केली आहे. अर्ध्याहून अधिक डिजिटल बँकिंग ग्राहकांना पेमेंट बँक वापरून पाहण्याची उत्सुकता आहे. यासाठी तुमच्या व्यवहारांवर पेमेंट बँक कशा प्रकारे परिणाम करेल ते देत आहोत.

### व्यवहार शुल्क कमी

सध्या देशात कार्यरत असलेल्या बँकिंग प्रणालीला या नव्या पेमेंट बँका साह्यभूत होणार आहेत. त्याचबरोबर यामुळे बँकांमध्ये स्पर्धा वाढणार आहे. पेमेंट बँकांना परवानगी दिलेल्या उद्योगसमूहांची आर्थिक स्थिती सक्षम असल्यामुळे या उद्योगांच्या पेमेंट बँकांतून ग्राहकांना व्यवहार शुल्क कमी आकारले जाण्याची शक्यता आहे. देशातील बँकांचे व्यवहारशुल्क जवळपास सारखेच आहे. परंतु या बँकांकडून कदाचित शून्य व्यवहार शुल्कदेखील आकारले जाण्याची शक्यता आहे.

### सेवेचा चांगला दर्जा

पेमेंट बँका निर्णय घेण्यात, सेवा देण्यात चपळता दाखवतील अशी अपेक्षा आहे. यामुळेच त्या ग्राहकाच्या बदलत्या गरजांना चटकन प्रतिसाद देतील, अशीही अपेक्षा आहे. याचा थेट परिणाम म्हणून सध्याच्या बँकाही चांगल्या दर्जाच्या सेवा देऊ लागतील. ग्राहकाच्या गरजांनुसार न बदलणे याचा अर्थ बँकांनी सरकारी पद्धतीने काम करणे होय. काही बँका आजही खातेदार असलेल्या जुन्या ग्राहकांनादेखील डिमांड ड्राफ्ट काढण्यासाठी चेक पेमेंट करण्यास सांगतात. असा स्थितीत गतिमान व दर्जेदार सेवा देण्यासाठी पेमेंट बँकांना भरपूर संधी आहे.

### तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर

व्होडाफोन एम-पेसा, एअरटेल मनी व फिनो पे-टेक या कंपन्यांना पेमेंट बँक स्थापन करण्याची परवानगी मिळाली आहे. या कंपन्यांनी मोबाइल आधारित तसेच तंत्रज्ञानाधारित पेमेंट प्रक्रिया सेवा देण्यात आघाडी घेतली आहे. या व अशा कंपन्या पेमेंट बँका स्थापन केल्यावर तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करतील, जेणेकरून व्यवहार पूर्ण करण्यासाठी लागणार वेळ वाचेल. यामुळे ग्राहकाला रोकड कमीत कमी वापरण्यास मदत मिळेल.

### नवकल्पना

अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या, बाजारात स्थिरावलेल्या व ग्राहकांचा विश्वास कमावलेल्या बँकांशी नव्या पेमेंट बँकाची स्पर्धा आहे. त्यामुळे या पेमेंट बँकांना कारभारात नवकल्पना राबवाव्या लागतील. तरच त्या स्पर्धेत टिकू शकतील. यामुळे या बँकाकडून दिल्या जाणाऱ्या आर्थिक उत्पादनांची संपूर्ण रचनाच बदलून जाईल. या बँकांना ग्राहकाभिमुख विचार करावाच लागेल.

### व्यापक जाळे

पेमेंट बँका स्थापन करण्यासाठी परवानगी मिळालेल्या उद्योगसमूहांची किंवा कंपन्यांची बाजारात चांगली प्रतिमा आहे. या कंपन्या बाजारात प्रत्यक्ष किंवा डिजिटल स्वरूपात पाय रोवून आहेत. उदाहरणार्थ, भारतीय पोस्ट, फिनो पे-टीएम आणि चोलामंडलम डिस्ट्रिब्युशन सिस्टिम यांना स्वत:चा असा मोठा ग्राहकवर्ग आहे. काही कंपन्या त्यांची सध्याची क्षमता वापरतील. यामुळे बँकिंग सेवांचा दर्जा उंचावेल यात काहीच शंका नाही.